**रे.के.नं. १९०/२०२२**

**नि.क्र. ५०/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.११** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | **विशाल कृष्णा कोळी** |
| वय | - | ४७ वर्षे |
| व्यवसाय | - | ड्रायव्हर |
| राहणार | - | महिम मुंबई |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती शितल पवार यांच्यामार्फत...</u>**

१. उरण ही माझी सासरवाडी आहे. त्यामुळे मी उरण येथे येत जात राहतो. माझेकडे मारूती वैगनेर क्रमांक एम. एच .०१ सी.जे २६०१ हे वाहन आहे. माझी सासरवाडी हनुमान कोळीवाडा उरण येथे आहे. दिनांक २२.११.२०२० रोजी मी माझ्या कुटुंबासह उरण येथे आलो होतो. दिनांक २३.११.२०२० रोजी वापस जाण्याकरीता मी गाडीजवळ आलो असता माझ्या गाडीचे डाव्या बाजूचे समोरचे व मागचे टायर जळालेले दिसले. त्यामुळे माझे नुकसान झाले. मी ते वाहन माझे सास-यांच्या घरासमोरच लावले होते.त्यामुळे मी पोलिस ठाणे मोरा येथे जाउन फिर्याद दिली होती. त्यानंतर मला माझ्या सासरच्यांकडून समजले की, माझ्या गाडीचे टायर प्रसाद पंडीत नावाच्या व्यक्तीने जाळले होते.

**सरतपास संपला**

<u>**उलटतपास आरोपीचे वकील रोशनी बारे यांच्याव्दारे सुरू**</u>

२. पोलिसांनी माझा जबाब दिनांक २२.०३.२०२१ रोजी घेतला होता.मी जबाब देतेवेळी पोलिसांना माझ्या वाहनाचा क्रमांक सांगितला होता. मी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीला अटक करून माझ्या समक्ष शहानिशा करण्यासाठी आणले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात पोलिसांनी कोणाला अटक केले याची वैयक्तीक माहिती मला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वाहनाचे दोनही टायर कोणी जाळले यांची वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला..**
**फेरतपास नाही..**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/-

**उरण,** **(एस. पी. वानखडे)**

दिनांक – ०२/०२/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

न्यायालय क्र. २